दैनिक

महाराष्ट्राच्या परिवर्तनवादी विचारांचे निर्भिड दैनिक

# वादळ वार्ता

मुख्य संपादक : अजश भांगे

बीड/महाराष्ट्र | बुधवार दि.२६ फेब्रुवारी २०२५ | आरएनआय-एमएएचएमएआर/२०२३/८७५५५ | वर्ष २ रे | अंक-१२२ | पाने ४ | किंमत ४ रुपये







# एआय-तंत्रज्ञान क्रांतीचे नेतृत्व महाराष्ट्र करणार
# देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला विश्वास

## कृषी क्षेत्रात तंत्रज्ञानाचा वापर वाढवणार; डेटा सेंटर आणि फिनटेक क्षेत्रात महाराष्ट्र आघाडीवर

**मुंबई (वृत्तसंस्था)**

तंत्रज्ञान व कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (-ख) माध्यमातून राज्य शासनामार्फत प्रशासन व अर्थव्यवस्थेला गती देण्यात येत असून महाराष्ट्र राज्य लवकरच भारताच्या एआय आणि तंत्रज्ञान क्रांतीचे नेतृत्व करेल, असा विश्वास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्यक्त केला. हॉटेल ग्रँड हयात येथे नॅसकॉम टेक्नॉलॉजी अँड लीडरशिप समीट कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची नॅसकॉमचे श्रीकांत वेलामकन्नी यांनी मुलाखत घेतली.मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले, राज्यात डिजिटल सेवांचे प्रमाण वाढले असून, बहुतांश शासकीय सेवा ऑनलाइन उपलब्ध झाल्या आहेत. राज्य शासनाने मुंबई विद्यापीठात एआय सेंटरची स्थापना केली आहे. जागतिक आर्थिक मंचासोबत भागीदारी तून इंडस्ट्री केंद्र स्थापन करण्यात आले आहे. मुख्यमंत्री म्हणाले की, महाराष्ट्राने १ ट्रिलियन डॉलर पर्यंत अर्थव्यवस्था नेण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे. यासाठी राज्याने नीती आयोगाच्या सहकार्याने नवीन आर्थिक रोडमॅप तयार केला जात आहे. विशेषतः मुंबई महानगर क्षेत्राला (चचठऊ-) १.५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचा केंद्रबिंदू बनवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे ते म्हणाले. देशातील ६०% डेटा सेंटर्स महाराष्ट्रात आहेत. नवीन मुंबईत डेटा सेंटर पार्क उभारण्यात येत असून, २०३० पर्यंत राज्यातील ५०% वीजनिर्मिती हरित ऊर्जेवर आधारित असेल. मुंबई ही भारताची 'फिनटेक राजधानी' असल्याचेही ते यावेळी म्हणाले.नाशिक येथे २०२७ मध्ये कुंभमेळा होणार आहे. या ठिकाणी गर्दी व्यवस्थापन, सुरक्षा, आणि आभासी अनुभव यासाठी अत्याधुनिक उपाययोजना केल्या जातील. यावेळी त्यांनी उत्तर प्रदेशात महाकुंभमेळा यशस्वीपणे आयोजित केल्याबद्दल उत्तर प्रदेशच्या मुख्यमंत्र्यांचे कौतुकही केले.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, शेतीमध्ये तंत्रज्ञानाच्या मदतीने शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचा प्रयत्न सुरू आहे. 'ॲग्री-स्टॅट' उपक्रमाअंतर्गत संपूर्ण शेती प्रक्रियेचे डिजिटलायझेशन करण्यात येत आहे. 'ड्रोन शक्ती' कार्यक्रमांतर्गत ड्रोन प्रशिक्षण देऊन कृषी फवारणी खर्च कमी करण्याचा मानस आहे.नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ परिसरात तिसरी मुंबई विकसित करणार असल्याचे सांगून मुख्यमंत्री म्हणाले, ही 'इनोव्हेशन सिटी' देशातील सर्वात प्रगत शहरांपैकी एक ठरेल. तीनशे एकरमध्ये ही सिटी विकसित केली जाणार असून या सिटीमध्ये तंत्रज्ञान, नाविन्यपूर्ण संशोधन, आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स यावर भर दिला जाणार आहे. तसेच महाराष्ट्रात मुंबई, पुणे, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक येथे जीसीसी पार्क विकसित करणार असल्याचेही ते म्हणाले. यासाठी उद्योग आणि तंत्रज्ञान क्षेत्रातील तज्ज्ञांनी आपल्या कल्पना आणि योगदान द्यावे, असे आवाहनही मुख्यमंत्र्यांनी यावेळी केले.



# नांदेड,हिंगोली,वाशीम, अकोला मार्गे बिदर-हज़रत निज़ामुद्दीन विशेष रेल्वे



**जालना । असलम कुरेशी**

प्रवाशांची गर्दी लक्षात घेवून दक्षिण मध्य रेल्वेने बिदर ते हजरत निज़ामुद्दीन दरम्यान विशेष गाडीची एक फेरी पूर्ण करण्याचे ठरविले आहे. ही विशेष गाडी विकाराबाद, सिकंदराबाद, निज़ामाबाद, मुदखेड, नांदेड, पूर्णा, हिंगोली, वाशीम, अकोला मार्गे धावेल. ती पुढील प्रमाणे.


गाडी क्रमांक ०७२२३ बिदर ते हजरत निज़ामुद्दीन विशेष ही विशेष गाडी बिदर येथून दिनांक २६ फेब्रुवारी २०२५ रोजी बुधवारी सकाळी ०६.०० वाजता सुटेल आणि ज़हीराबाद, विकाराबाद, लिंगमपल्ली, सिकंदराबाद, मेडचल, आकनापेट, कामारेड्डी, निज़ामाबाद, बासर, धर्माबाद, मुदखेड, नांदेड, पूर्णा, हिंगोली, वाशीम, अकोला, मलकापूर, ब-हाणपूर, खंडवा, इटारसी, भोपाळ, संत हिर्दाराम नगर, सेहोर, उज्जैन, नागडा, कोटा, मथुरा, पलवल मार्गे हज़रत निज़ामुद्दीन येथे गुरुवारी रात्री २२.४० वाजता पोहोचेल.

गाडी क्रमांक ०७२२४ हजरत निजामुद्दीन ते बिदर ही विशेष गाडी हज़रत निज़ामुद्दीन येथून दिनांक ०१ मार्च २०२५ रोजी शनिवारी सकाळी ०७.४५ वाजता सुटेल आणि आलेल्या मार्गानेच सोमवारी सकाळी ०४.०० वाजता बिदर येथे पोहोचेल. या गाडीत द्वितीय शय्या, वातानुकुलीत असे एकूण २४ डब्बे असतील.

# स्वाराती रुग्णालयात ॲन्जोग्राफी तपासणी होणार सुरु ,प्रशासन लागले कामाला

**अंबाजोगाई । परवेज पटेल**

गोरगरीब रुग्णांसाठी संजीवनी ठरलेल्या 'स्वाराती' रुग्णालयात एक धक्कादायक बाब समोर आली होती. गेल्या वर्षभरापासून रुग्णालयात ८ कोटींची ॲन्जोग्राफी व ॲन्जोप्लास्टीची मशीन धूळखात पडली आहे, अशी माहिती आम्हाला सूत्रांकडून मिळाली होती. याबाबतचे सविस्तर वृत्त आम्ही 'अंबाजोगाई मिरर' च्या माध्यमातून प्रकाशित केले होते. त्याचाच आधार घेत आता 'स्वाराती' प्रशासनाने सकारात्मक पाऊल उचलले आहे. ॲन्जोग्राफी व ॲन्जोप्लास्टीची मशीन रुग्णालयात कार्यान्वित करण्यासाठी 'स्वाराती' प्रशासनाने पुढाकार घेतला असून लवकरच एका तज्ज्ञ कार्डीयॉलॉजिस्टची नेमणूक करण्यात येणार आहे. ज्यात ॲन्जोग्राफीची तपासणी करण्यात येणार आहे. त्यामुळे मोठ्या प्रमाणात रुग्णांना दिलासा मिळणार आहे. 'स्वाराती' रुग्णालय व वैद्यकीय महाविद्यालयात गोरगरीब रुग्णांना दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध व्हावी, यासाठी राज्य सरकारकडून करोडो रुपयांचा निधी उपलब्ध करुन देण्यात येत आहे. याचाच भाग म्हणून गेल्या वर्षी वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागानं ८ कोटींची ॲन्जोग्राफी व ॲन्जोप्लास्टीची मशीन रुग्णालयाला उपलब्ध करुन दिली. या



मशीनची इन्स्टॉलेशन प्रकिया देखील पूर्ण झाली असून केवळ डॉक्टर्स आणि टेक्निशियन अभावी ही मशीन रुग्णालयात धूळखात पडून आहे. रुग्णालयात ही मशीन कार्यान्वित झाल्यास हृदयरोगाचे निदान व उपचार करण्यास मदत होणार आहे.

**काय आहे ॲन्जोग्राफी ?**

हृदयरोगाचे प्रमाण दिवसेंदिवस वाढतच चालले आहे. हृदयविकार हा वयाच्या कोणत्याही टप्प्यावर येवू शकतो. डॉक्टरांना वाटत असल्यास की एखाद्या व्यक्तीला हार्ट अटॅक येण्याची शक्यता आहे तर ते त्याची ॲन्जोग्राफी करण्यास सांगतात. ॲन्जोग्राफीमध्ये रक्तवाहिन्यांमध्ये ब्लॉकेजेस आहेत का ? ब्लॉकेजेस कुठे व किती आहेत. या सगळ्या गोष्टी ॲन्जोग्राफीमध्ये समजतात. तसेच ब्लॉकेजेसची स्थिती समजते. रक्तवाहिन्यांमध्ये गुठळी आहे की नाही याचे नक्की निदान यामध्ये सापडते. ही ॲन्जोग्राफी करण्यासाठी खाजगी रुग्णालयात भरमसाठ फी आकारली जाते.

# पशुपालक व शेतकऱ्यांनी आपल्या जनावरांचे लसीकरण करून घ्यावे-पशुसंवर्धन विभाग नायगांव

**नायगाव । प्रतिनिधी**

नायगाव तालुक्यातील शेतकरी बांधव व पशुपालक यांनी आपल्या लाल, खुरी , घाट सराप यासह अनेक आजार होऊ नये यासाठी प्रतिबंध लसीकरण करून घ्यावे असे आवाहन पशुसंवर्धन विभाग नायगाव च्या वतीने करण्यात आलेला आहे शेतकऱ्यांनी आपल्या जनावरांची काळजी घ्यावी दिवसभरात किमान तीन वेळा पिण्याचे पाणी पाजवावे जनावरांना पोटभर चारा व उष्णतेपासून दूर ठेवावे जनावरांना ताप तोंडात गरम, जनावर चारा खात नसेल व तोंडातून फेस येत असेल अशा जनावरांना तातडीने प्राथमिक पशु चिकित्सालय किंवा डॉक्टरांना बोलून उपचार करावे सध्या ससर्कजन्य होऊ नये यासाठी आपल्या जनावरांचा लसीकरण करून घ्यावे असे आवाहन पशुसंवर्धन विभाग नायगाव व पशु वैद्यकीय अधिकारी गौतमजी खिल्लारे साहेब यांच्याकडून करण्यात आला आहे

### अजितदादांच्या घोषणेनंतर महिन्याभरातंच मंजूरी

# पालकमंत्री अजितदादांच्या प्रयत्नांमुळे महिन्याभरातंच मिळाली पुणे आणि बीड जिल्ह्याला दोन नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालये

## बारामती, परळी पशुवैद्यकीय महाविद्यालयांना राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज मान्यता

**मुंबई । प्रतिनिधी**

उपमुख्यमंत्री अजित पवार पालकमंत्री असलेल्या पुणे आणि बीड या दोन्ही जिल्ह्यांमध्ये दोन नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्यास राज्य मंत्रिमंडळाने आज मान्यता दिली. मागील जानेवारी महिन्यात बारामती येथे आयोजित 'कृषिक-२०२५' प्रदर्शनात उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी पुण्यात बारामती आणि बीड जिल्ह्यात परळी येथे नवीन पशुवैद्यकीय महाविद्यालये स्थापन करण्याची घोषणा केली होती. त्यानंतर महिन्याभरातच सर्व प्रक्रिया पूर्ण होऊन त्या प्रस्तावांना आज मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली. यामुळे उपमुख्यमंत्री अजित पवार यांचे प्रशासकीय कौशल्य आणि कामाचा झपाटा पुन्हा एकदा अनुभवायला मिळाला.महाराष्ट्र शेतीप्रधान राज्य असून शेतीच्या बरोबरीनं पशुधनाचा विकासही महत्वाचा आहे. आज मंजूरी मिळालेल्या बारामती आणि परळी येथे नवीन शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालयांमुळे पशुपालकांना अत्याधुनिक, दर्जेदार पशुवैद्यकीय सेवा मिळणार असून, राज्यात प्रशिक्षित पशुवैद्यकांची संख्या वाढण्यास मदत होणार आहे. राज्यातील पशुधनाच्या आरोग्याची काळजी आणि विकासासाठी ही पशुवैद्यकीय महाविद्यालये महत्वाची भूमिका बजावतील, असा विश्वास यानिमित्ताने व्यक्त करण्यात येत आहे.

**बारामती 'कृषिक २०२५' प्रदर्शनातील घोषणा महिनाभरात पूर्ण**

बारामती येथे जानेवारी २०२५ महिन्यात आयोजित 'कृषिक-२०२५' कृषी प्रदर्शनात, शेतकरी आणि पशुपालकांनी बारामतीमध्ये पशुवैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याची मागणी केली होती. या मागणीला तातडीने प्रतिसाद देत ही महाविद्यालये स्थापन करण्यात येतील, अशी घोषणा अजितदादांनी सभेत केली होती. त्यानंतर महिन्यातच अजितदादांनी मंत्रिमंडळाची मंजुरी मिळवून दिली. बारामतीतील कऱ्हावागज येथे ८२ एकर आणि परळीच्या लोणी येथे ७५ एकर जागेवर ही शासकीय महाविद्यालये उभारली जाणार आहेत.

**पशुपालन क्षेत्राला मोठी चालना मिळणार**



उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलरवर नेण्याचे ध्येय ठेवले आहे. यासाठी शेती आणि शेतीपुरक व्यवसायांना चालना देण्याची गरज ओळखून, पशुपालन आणि दुग्ध व्यवसायाला प्रोत्साहन देण्याचा महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. सध्या राज्यात पशुवैद्यकीय सेवा आणि पशुवैद्यकांची मोठ्या प्रमाणावर गरज असून, नवीन महाविद्यालयांमुळे प्रशिक्षित पशुवैद्यकांची संख्या वाढेल आणि राज्यभर पशुसंवर्धन सेवा अधिक भक्कम होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

**प्रत्येकी २३४ नियमित, ४२ मानधनावरील पदांना मान्यता**

या शासकीय पशुवैद्यकीय महाविद्यालयांसाठी मोठ्या प्रमाणात पदनिर्मिती करण्यात आली आहे. प्रत्येक महाविद्यालयासाठी शिक्षक संवर्गात ९६, शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांसाठी १३८ नियमित पदे मंजूर करण्यात आली आहेत. त्याशिवाय, बाह्यस्त्रोतांद्वारे प्रत्येकी ४२ पदे मानधन तत्त्वावर भरण्यासही मान्यता देण्यात आली आहे.

**महाविद्यालयांसाठी १०९२ कोटींची आर्थिक तरतूद**

बारामती आणि परळी येथील महाविद्यालयांसाठी एकूण १०९१.५७ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. बारामतीच्या महाविद्यालयासाठी ५६४.५८ कोटी रुपये तर परळीच्या महाविद्यालयासाठी ५२६.८० खर्च होणार असून, या निधीतून प्रगत संशोधन केंद्रे, अत्याधुनिक प्रयोगशाळा आणि आधुनिक सुविधा उभारल्या जातील.

**पशुपालकांचा आनंद, राज्य सरकारच्या निर्णयाचे स्वागत**

या निर्णयामुळे राज्यातील पशुपालकांना मोठा दिलासा मिळणार असून, अत्याधुनिक पशुवैद्यकीय सुविधा अधिक सुलभ होतील. विशेषतः, बारामती आणि परळी परिसरातील शेतकरी व पशुपालकांनी सरकारच्या या निर्णयाचे स्वागत केले आहे. हा निर्णय कृषिपूरक व्यवसायांना चालना देईल आणि राज्यातील पशुधन संगोपनासाठी नव्या संशोधन आणि तंत्रज्ञानाचा मार्ग मोकळा करेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे.

**अजितदादांची आणखी एक महत्वपूर्ण कामगिरी!**

राज्याचे उपमुख्यमंत्री, अर्थमंत्री तसेच पुणे आणि बीड जिल्ह्याच्या पालकमंत्रीपदाची जबाबदारी सांभाळणारे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी महिन्याभराच्या अतिशय कमी वेळात हा लोकोपयोगी निर्णय मंजूर करून घेतला. त्यामुळे त्यांच्या नेतृत्वाखालील पुणे व बीड जिल्ह्यासह राज्याच्या विकासाला चालना मिळणार आहे.

## संपादकीय

# दारुबंदीची नशा

‘दारू काय पिता? दूध प्या’ असे आदर्शवादी आवाहन करत बिहारचे तत्कालीन मुख्यमंत्री नितीश कुमार यांनी २ ऑक्टोबर, २०१६पासून राज्यात दारूबंदी लागू केली. बिहारमधील गुन्हेगारी कमी करणे, कौटुंबिक अत्याचाराच्या घटना नियंत्रणात आणणे आदी उदात्त हेतू ह्या घोषणेमागे होते. नितीश यांच्यावर असलेला गांधीवाद व समाजवादी विचारसरणीचा पगडाही या धोरणासाठी प्रेरक होता. मात्र हे धोरण लागू करण्यापूर्वी त्यासाठी आवश्यक असणारे वातावरण त्यांनी निर्माण केले होते का, कोणत्याही प्रकारचे मद्य उपलब्ध होऊ नये यासाठी आवश्यक ती प्रशासकीय सिद्धता केली होती का आदी प्रश्न उपस्थित व्हावेत अशी परिस्थिती सध्या बिहारमध्ये दिसत आहे. पैसेवाल्यांना सहज उपलब्ध होणारे उंची मद्य; लपूनछपून का होईना, परंतु कधीही मिळणारी गावठी व देशी दारू आणि पोलिस प्रशासनाचे त्यावर नसलेले नियंत्रण हे सर्व पाहता नितीश यांचे हे धोरण स्वप्नाळूच होते असे म्हणण्यास वाव आहे.

बिहार प्रोहिबिशन अँड एक्साइज अ‍ॅक्ट, २०१६द्वारे बिहारमध्ये दारूबंदी लागू करण्यात आली. या कायद्यानुसार राज्यात दारूचे उत्पादन, ने-आण, खरेदी-विक्री, साठा करणे यावर बंदी घालण्यात आली. या कायद्यांतर्गत प्रथम दोषी ठरल्यास तीन महिने तुरुंगवास व ५० हजार रुपये दंड या शिक्षेची तरतूद आहे. अधिक गंभीर गुन्ह्यांसाठी पाच ते दहा वर्षे तुरुंगवासाचीही तरतूद आहे. राज्यात दारूबंदी लागू केल्यानंतर आजवर नितीश कुमार हेच मुख्यमंत्रिपदी आहेत. कधी राष्ट्रीय जनता दल तर, कधी भारतीय जनता पक्षाशी युती करून त्यांनी मुख्यमंत्रिपद राखले आहे. त्यामुळे आपले हे महत्त्वाकांक्षी धोरण यशस्वी करण्याची जबाबदारी मुख्यत्वे त्यांचीच आहे. त्यासाठी त्यांना पुरेशी संधीही मिळाली. परंतु याविषयी सरकारकडून देण्यात येणारे आकडेच या धोरणाचे अपयशच दर्शवतात.

दारूबंदीनंतरच्या आठ वर्षांत बिहारमध्ये दोनशेहून अधिक जणांचा विषारी दारू पिऊन मृत्यू झाला आहे. हा सरकारी आकडा असल्याने खरा आकडा त्याहून अधिक असण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कालावधीत ३.४६ कोटी लिटर मद्य जप्त करण्यात आले आहे. दारूबंदीचा कायदा या ना त्या कारणाने मोडल्याप्रकरणी ८.४३ लाख गुन्ह्यांची नोंद झाली आहे व १२.७ लाख जणांना अटक करण्यात आलेली आहे. अन्य राज्यांतून होणारी मद्यतस्करी ही तर नित्याचीच बाब झाली आहे. गेल्या आठवड्यात घडलेली घटना ही या धोरणासंदर्भातील आजवरची सर्वांत भीषण घटना आहे. सिवान व सारन या जिल्ह्यांत विषारी दारू प्यायल्याने ३५ जणांना प्राण गमवावे लागले, तर अनेकांची दृष्टी गेली. या जिल्ह्यांत काही ठिकाणी असलेल्या जत्रांमध्ये प्लास्टिकच्या पिशव्यांमधून ही दारू विकली जात होती असे समजते. हा सगळा चोरीचा मामला असल्याने कारवाईच्या भीतीपोटी अनेकांनी चोरूनच वैद्यकीय उपचार करून घेणे पसंत केले. त्यामुळे बळींचा आकडाही खरा नसावा. यातील मृतांच्या वारसांना सरकारने २५ लाख रुपयांची मदत घोषित केली आहे, तर दृष्टी गमावलेल्यांना दहा लाख रुपये देण्यात येणार आहेत.या प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन नितीश यांनी दिले आहे. परंतु हे प्रकार रोखण्यासाठी कोणते ठोस उपाय करता येतील यावर सरकार विचार करताना दिसत नाही. या प्रकारानंतर अपेक्षेनुसार राजकीय आरोप-प्रत्यारोप होऊ लागले आहेत. सरकारने मद्यधोरणाचा पुनर्विचार करावा, अशी मागणी विरोधकांकडून होत आहे. दुसरीकडे, दारूबंदीच्या निर्णयाचा राज्यभरात नेमका काय परिणाम झाला, किती जणांनी दारू सोडली, या धोरणामुळे काय सामाजिक बदल झाले याचा धांडोळा घेण्यासाठी राज्य सरकारकडून आयआयएम रांचीमार्फत गेल्या वर्षीपासून सर्वेक्षण सुरू आहे. हे सर्वेक्षण आता अंतिम टप्प्यात आहे. परंतु यातून निघणारे निष्कर्ष हे कितपत वस्तुनिष्ठ असतील याविषयी साशंकताच आहे.

या दारूबंदीस आर्थिक विषमतेचीही किनार आहे. मद्यनिर्मितीस परवानगी नाही व मागणी मात्र आहे, अशी विचित्र स्थिती बिहारमध्ये आढळते. ज्यांना उंची, विदेशी मद्य परवडते ते मद्यप्रेमी काही करून आपली हौस भागवू शकतात. ज्यांना ते परवडत नाही असे अल्प उत्पन्न गटातील लोक मिळेल ती दारू जवळ करतात व त्यातूनच अशा दुर्घटना घडतात. बिहारचे माजी मुख्यमंत्री व विद्यमान केंद्रीय मंत्री जीतनराम मांझी हे वादग्रस्त ठरतील अशी विधाने अधूनमधून करत असतात. सप्टेंबरमध्ये त्यांनी केलेल्या एका विधानाने सत्ताधाऱ्यांना चांगलेच अडचणीत आणले. ‘आम्ही उच्चभ्रू हवं तेव्हा निश्चिंतपणे दारू पितो, पोलिस आम्हाला पकडत नाहीत. मात्र, दारूबंदीचा त्रास केवळ गरिबांना होतो. हा दुटप्पीपणा थांबायला पाहिजे,’ असे ते म्हणाले होते. मांझी यांचे हे विधान पोलिटिकली करेक्ट नसले तरी याद्वारे बिहारमधील मद्यधोरणाचा मुखवटाच त्यांनी फाडला हे नाकारता येणार नाही.ज्या राज्यात दारूबंदी आहे, तेथेच विषारी दारूचे सेवन केल्यामुळे बळी जात असल्याचा विरोधाभास बिहारमध्ये वारंवार दिसतो. पोलिस यंत्रणा, उत्पादन शुल्क विभाग, प्रशासकीय अधिकारी यांच्यासह खुद्द मुख्यमंत्री या समस्येवर कायमस्वरूपी तोडगा काढू इच्छितात का, हा प्रश्न अनुत्तरित आहे. आपले आदर्शवादी धोरण यशस्वी करायचे असेल तर दुर्दम्य इच्छाशक्ती हवी, मात्र नितीश कुमार यांच्या सरकारमध्ये नेमका त्याचाच अभाव दिसतो. दारूबंदीची ही नशा दिवसेंदिवस अधिकाधिक घातक ठरत आहे.

# उड्डाणानंतर हवी नियोजनाची भरारी



गेल्याच आठवड्यात उलवे आणि पनवेल, नवी मुंबई, येथील नव्या विमानतळाच्या धावपट्टीचे प्रायोगिक तत्वावर, हवाई दलाच्या एका विमानाच्या आगमनाने उद्घाटन केले गेले. गेली कित्येक दशके मुंबईतील जुन्या सहार येथील गर्दीने वैतागलेल्या हवाई वाहतूक कंपन्यांना आणि प्रवाशांना यामुळे आशेचा किरण दिसू लागला. या भागाचे विधानसभेत प्रतिनिधित्व करणारे लोकप्रिय माजी आमदार दिवंगत दिनकर बाळू (दि. बा.) पाटील यांचे नाव प्रस्तावित असलेल्या या विमानतळ प्रकल्पाचे यानिमित्ताने अवलोकन करणे उचित ठरावे.

मुंबई व महामुंबईसाठी वापरात असलेल्या एकमेव व जुन्या सहार विमानतळाची क्षमता वेगाने वाढणाऱ्या विमानसेवेला पुरे पडणार नाही, हे ३० वर्षांपूर्वीच जाणवले होते. १९९७मध्येच मुंबईला पूरक ठरणाऱ्या विमानतळाच्या उभारणीसाठी १९९७मध्येच तत्त्वतः मान्यता दिली गेली होती. त्यानंतर ‘आंतरराष्ट्रीय नागरी हवाई वाहतूक संस्थे’ची संमती असलेल्या तज्ज्ञांची एक समिति नेमण्यात आली. मुंबईच्या तसेच सभोवतीच्या रहिवाशांच्या व उद्योगधंद्यांच्या गरजा भागविण्यासाठी, तेही सहारच्या वाहतुकीवर दुष्परिणाम होणार नाही, अशा जागी नव्या विमानतळाचे स्थान निश्चित करणे, हे ह्या समितीचे काम होते. समितीने आधी सहा निकषांची एक यादी तयार केली. त्यात आवश्यक तेवढ्या जमिनीची उपलब्धता, सहार आणि मुंबई शहरापासून योग्य ते अंतर, विमानांना लँडिंग आणि टेक ऑफसाठी लागणारे मार्ग आणि त्यातील अडथळे, पर्यावरण आणि अवास्तव खर्चापासून बचाव हे मुख्य निकष होते.

त्याशिवाय संरक्षण आणि गृह मंत्रालयाच्या गरजा यांचाही विचार करण्याची तरतूद त्यात होती. समितीने हे सर्व लक्षात घेऊन, उत्तरेस कल्याण आणि दक्षिणेस सिंधुदुर्ग यामधील सहा जागांचे परीक्षण केले. मग रेवस-मांडवा आणि पनवेल या जागा त्यातून निवडण्यात आल्या. रेवस-मांडवा येथील जागेस स्थानिकांकडून तसेच हवाई वाहतूक क्षेत्रातील तज्ज्ञांकडूनही विरोध झाला. प्रदीर्घ परीक्षणानंतर पनवेल-उलवे ह्या जागेची शिफारस करण्यात आली. जुलै २००७च्या मुंबईच्या महाप्रलयाची आठवण ताजी होती, म्हणून पनवेल खाडी आणि निवडलेल्या जागेच्या जवळ असलेल्या लहान मोठ्या नद्यांच्या पुराचे काय परिणाम संभवतात, याविषयी पुण्याच्या सेंट्रल वॉटर आणि पॉवर संशोधन केंद्राकडून अहवाल मागविण्यात आला. पनवेलवर भरतीच्या आणि विमानतळावरून ओसरण्याऱ्या पाण्याचा काय परिणाम होईल, याकडे विशेष लक्ष पुरविण्यात आले. विमानतळासाठी टाकण्यात येणाऱ्या भरावाची उंची पनवेलकडे जास्त आणि पनवेल खाडीकडे बरीच कमी ठेवण्याचे त्यातून ठरले. त्यानंतरच निवडलेल्या जागेची शिफारस राज्य सरकार, भारत सरकार व आयसीएओ (आयकाव किंवा आंतरराष्ट्रीय नागरी विमानवाहतूक संस्था) यांच्याकडे करण्यात आली.

तरीही प्रकल्पाच्या विरोधात राजकीय दबाव मोठा होता. स्थानिक जनतेचा व पर्यावरणप्रेमींचा प्रकल्पास विरोध होता. न्यायालयात याचिका, नोटिसा यांचाही सामना त्यामुळे प्रकल्पाला करावा लागला. त्यात प्रकल्प प्रत्यक्ष सुरू होण्यात मात्र बराच वेळ गेला. या सर्व पार्श्वभूमीवर प्रकल्पाचा खर्च मूळ ९ हजार कोटींवरून २१ हजार कोटी रुपयांवर गेला आणि तो पूर्ण करण्याची तारीख अगणित वेळा पुढे ढकलण्यात आली. प्रकल्पाची निविदा त्या वेळच्या सहार विमानतळाची खासगी क्षेत्रातील कंपनीने जिंकली. परंतु प्रकल्प अर्ध्यावर असताना त्यांनी शरणागती पत्करली आणि प्रकल्पाची मालकी आणि व्यवस्थापन अदानी आणि त्यांचे परकीय भागीदार ह्यांच्याकडे आले. ह्या हस्तांतरात आणखी वेळ गेला.

कुठल्याही विमानतळावर धावपट्टी ही एक मूलभूत गरज आहे. नवी मुंबईच्या नव्या विमानतळावर दोन समांतर धावपट्ट्यांची सोय आहे. प्रकल्प एकूण चार टप्प्यांमध्ये विकसित केला जाणार आहे. त्यातल्या पहिल्या टप्प्याचा श्रीगणेशा गेल्या आठवड्यातील उड्डाणाने झाला. परंतु हवाई वाहतूकसेवा देणाऱ्या कंपन्यांना विमानतळाच्या २०२५च्या मार्चपर्यंत वाट बघावी लागेल, असा सध्याचा अंदाज आहे. आंतरराष्ट्रीय दर्जा प्राप्त करू पाहणाऱ्या विमानतळावर ज्या सर्व सोयी उपलब्ध असणे अत्यावश्यक आहे, त्यातल्या उरलेल्या काही सोयी येत्या काही महिन्यात उभारल्या जातील.

नव्या विमानतळावर ३७०० मीटर लांब आणि ६० मीटर रुंद अशा दोन समांतर धावपट्ट्या असतील. त्या एकमेकांपासून योग्य अंतरावर असल्यामुळे, दोन्ही धावपट्या एकाच वेळी वापरता येतील. सध्याच्या मुंबई विमानतळावर दोन धावपट्ट्या असल्या तरी त्या समांतर नव्हे, तर फुलीच्या आकाराच्या आणि कमी लांबी-रुंदीच्या आहेत. त्यामुळे नव्या विमानतळाची विमाने हाताळण्याची क्षमता सहारपेक्षा जास्त असेल. प्रवासी हाताळण्याची क्षमता, पहिल्या टप्प्यानंतर वर्षाला २ कोटी (सहारच्या एकूण क्षमतेच्या ४० टक्के) तर तिन्ही टप्पे झाल्यावर वर्षाला साडेपाच कोटी (सहारच्या दीडपट) असेल. तसेच मालवाहू क्षमताही सहारच्या दुप्पट असेल. साधारणतः खासगी वापरासाठी असलेली लहान विमाने तसेच हेलिकॉप्टर हाताळण्याची क्षमताही सहारच्या कितीतरी पटीने अधिक असेल. एकंदर तीन टर्मिनल्स प्रवाशांसाठी, आणखी एक टर्मिनल मालवाहू विमानासाठी आणि एक टर्मिनल खासगी विमानांसाठी असेल. मुंबई आणि नवी मुंबई येथील विमान वाहतुकीने एकमेकांना अडथळा न बनता, येण्या-जाण्यासाठी कुठले मार्ग स्वीकारावे हेही ठरवून झाले आहे. तसेच नव्या मुंबईच्या विमानांना विमानतळाच्या दक्षिणेला असलेल्या कर्नाळा पक्षी अभयारण्यावरून ठरावीक उंचीखालून उड्डाण करण्यास मज्जाव आहे. पर्यावरणास अनुकूल असा आणखी एक निर्णय म्हणजे खारफुटी संवर्धनासाठी उत्तरेकडचा बराच भाग सुरक्षित ठेवला गेला आहे.

या सर्व सकारात्मक गोष्टी असतानाच या नव्या विमानतळाच्या नियोजनात काही त्रुटी आहेत का? ह्या प्रश्नाचे उत्तर ‘आहेत’, असेच द्यावे लागेल. मुख्य त्रुटी दहशतवादी हल्ल्यांच्या प्रतिबंधात्मक सुरक्षेविषयी आहे. प्रवाशांना हाताळणारे टर्मिनल कुंपणापासून बरेच आत आहे. टर्मिनलपर्यंत नेणाऱ्या रस्त्याच्या (आणि बहुतेक नंतर बांधल्या जाणाऱ्या रेल्वेच्या दोन्ही बाजूला), विमानांचे पार्किंग आणि तीन टर्मिनल्सची सोय आहे. कुंपणाच्या रेषेत अडथळे आणि तपासणी पोस्ट ठेवले तरी ते धुडकावून, रॉकेट प्रोपेलड ग्रेनेडसारख्या अस्त्रांनी विमाने व टर्मिनलवर हल्ले करणे, कुटिल कारस्थाने करणाऱ्या दहशतवाद्यांना कठीण नाही. सध्या देशांतर्गत दहशतवादाचा निपटारा झाला आहे, असे मानून आपली पकड ढिली करणे धोक्याचे ठरेल. तिन्ही प्रवासी टर्मिनल पश्चिमी कुंपणाला लागून असती आणि विमाने कुंपणापासून दूर असती, तर सुरक्षा अधिक वाढली असती. विमानांना ‘हाय व्हॅल्यू टार्गेट’च्या यादीत ठेवले जाते हे लक्षात ठेवावे. उद्दिष्टपूर्तीचा दबाव नसता, तर अशा आराखड्याला आम्ही एरव्ही मान्यता दिली नसती, असे एका वरिष्ठ सुरक्षा अधिकाऱ्याने खासगी संभाषणात सांगितले.

ह्यानंतरच्या त्रुटींचे परीक्षण करताना कुंपणाला लागून असलेल्या वाहतूक सोयीचे अवलोकन करावे लागेल. ह्यासाठी विमानतळाच्या पूर्वेला असणारा आणि एक्सप्रेसवेला जोडणारा महामार्ग, दक्षिणेला असलेला पनवेल-उरण/ जे.एन,पी.टी. महामार्ग आणि रेल्वे, ह्यांचा अभ्यास करावा. जगात सर्वत्र तज्ज्ञांकडून ‘इंटरमोडल कनेक्टिव्हिटी’ला खूप महत्त्व दिले जाते. म्हणजे, माल आणि प्रवासी ह्यांचे रेल्वेतून/रस्त्यावरून, विमानात आणि उलट बदल, सोपे करणे. विमानतळाच्या दक्षिणेलाच एक एसईझेडसुद्धा आहे. असे असताना मालवाहू विमानांचे पार्किंग उत्तरेला का, दक्षिणेच्या जवळ का नाही हे समजणे कठीण आहे.

कनेक्टिव्हिटीचे आणखी दोन मुद्दे म्हणजे, पनवेल खाडीचा उपयोग करून २० ते ४० प्रवाशांच्या हॉव्हरक्राफ्टने विमानतळाला गेटवे ऑफ इंडिया आणि ठाणे खाडीला लागून असलेल्या उपनगरांना जोडणे आणि पनवेल खाडी पार करून सीबीडी बेलापूरला जोडणे. याविषयीची योजना प्रस्तावित आहे की नाही, हे पुरेसे स्पष्ट नाही. सल्लागारांच्या प्रकल्प अहवालात याची शिफारस नक्कीच होती. तसेच उपनगरीय रेल्वे/मेट्रो प्रवाशांना विमानतळाच्या पश्चिमेस आम्रा हायवेवर सोडणार, की टर्मिनलच्या जवळ, हेही स्पष्ट नाही. टर्मिनलजवळ सोडण्याची शिफारसही प्रकल्प अहवालात होती. ‘एरॉट्रोपोलिस’ म्हणजे विमानतळाला केंद्रबिंदू ठरवून, भोवतालचा भौगोलिक भाग निर्यातप्रधान, पण पर्यावरणास प्रतिकूल नसणाऱ्या उद्योगांनी विकसित करणे, आणि त्या बाबतीचे धोरण लवकरात लवकर स्पष्ट करणे अत्यावश्यक आहे.एव्हाना हे लक्षात आले असेल, की केवळ एक धावपट्टी आणि प्रवाशांच्या चढ-उतारासाठी एक इमारत बांधून समाधानाचा सुस्कारा सोडून चालत नाही. विमानतळ एक पांढरा हत्ती होऊ नये, तो अर्थव्यवस्थेचा आणि दळणवळणाचा एक महत्वाचा भाग व्हावा, यासाठी इतर अनेक पैलूंचा विचार करावा लागतो. तो तसा व्हायला हवा.

# समुद्राच्या पोटात चाललंय काय...

गडद निळा किंवा मोरपिशी रंगाचा लाटांचा पारदर्शक पडदा, त्यातून डोकावल्यास लालबुंद-जांभळे, हिरवे अशा रंगांचे तुडुतुडू धावणारे मासे, शेंदरी रंगाचे प्रवाळ, काटेरी झुडपे, एखाददुसरा तारामासा, शंख-शिंपले असे विलोभनीय दृश्य अंदमानच्या समुद्रात दिसते. स्कुबा डायव्हिंग किंवा समुद्राखाली पदभ्रमण केल्यास हे दृश्य डोळे दिपवून टाकते. समुद्राच्या पृष्ठभागाखाली ही अशी नवलाई असली, तरी काही गूढ हालचालीही तिथे सुरू असतात. त्या थेट आपल्या देशाच्या सुरक्षेला आव्हान देणाऱ्या असतात. या हालचाली किनारपट्टीपासून खूप दूरवर आणि खोलवर सुरू असतात. त्यांचा वेध घेण्यासाठी दृष्टी नव्हे, तर ध्वनी आणि श्रवण या दोन गोष्टी आवश्यक असतात. समुद्राच्या पोटात चाललंय काय, याचा अचूक आणि अव्याहत वेध घेत राहणे, हे आता सामरिक दृष्टीने नितांत गरजेचे ठरू लागले आहे.

या पार्श्वभूमीवर भारतीय संरक्षण दलांच्या व्यूहरचनेत गेल्या काही दिवसांत दोन महत्त्वाच्या घडामोडी घडल्या आहेत. त्यापैकी एक म्हणजे ‘आयएनएस अरिघात’ या अण्वस्त्रे डागण्याची क्षमता असलेल्या व अणुइंधनावर चालणाऱ्या दुसऱ्या पाणबुडीचा भारतीय नौदलाच्या ताफ्यात झालेला समावेश. (‘आयएनएस अरिहंत’ ही त्यातली पहिली). दुसरी घटना याच आठवड्यातली. ती म्हणजे तेलंगणमधील विकराबाद येथे दामगुडमच्या जंगलात तब्बल २९०० एकर क्षेत्रावर भारतीय नौदलाने एका अद्ययावत अतिदूरसंपर्कयंत्रणेच्या प्रणालीची पायाभरणी केली. ३२०० कोटी रुपये खर्चून उभारण्यात येत असलेले हे व्हीएलएफ म्हणजे व्हेरी लो फ्रिक्वेन्सी स्टेशन किंवा भूमीपासून कमी अंतरावरील अतिसूक्ष्म लहरींचे संपर्क केंद्र २०२७पर्यंत इथे उभे राहील. या केंद्रात संपर्कलहरींचे प्रसारण करण्यासाठी अनेक उंच मनोरे उभारले जातील. या मनोऱ्यांद्वारे हिंदी महासागरातच नव्हे, तर पृथ्वीच्या गोलाईवर कुठेही उभ्या असलेल्या नौका-हेलिकॉप्टर यांना सांकेतिक संदेशांचे प्रसारण करता येईल.

**भारतीय पाणबुड्यांना सांकेतिक संदेशवहन**

नौदलाच्या भात्यातील एक महत्त्वाचे छुपे अस्त्र म्हणजे पाणबुडी. ही पाणबुडी समुद्राच्या पृष्ठभागाखाली गेली की तिच्याशी इतर नौकांसारखा संवाद शक्य नसतो. किंबहुना, तो अनावश्यकच ठरतो. कारण पाणबुडीचा जर कुणाला ठावठिकाणा लागला, तर तिच्या मूळ उद्देशालाच हरताळ फासला जातो. साहजिकच उपग्रहआधारित संवाद इथे शक्य नसतो. परंतु पाणबुडीला आपल्या नौदलाच्या कमांड-कंट्रोल कक्षाद्वारे काही महत्त्वाचे व्यूहरचनात्मक संदेश धाडणेही वेळोवेळी गरजेचे असते. मग अशा वेळी संपर्क कसा साधायचा? त्यासाठीच ही व्हीएलएफ यंत्रणा उपयुक्त ठरते. अत्यंत कमी उंचीपर्यंत म्हणजे ३ ते ३० किलोहर्टझ् इतक्या पातळीवर हे संदेश धाडले जाऊ शकतात. ही गरज भारताने यापूर्वीच ओळखली होती. त्यामुळे १९९०पासून तमीळनाडूतील तिरूनेलवेली येथे अशा प्रकारचे व्हीएलएफ केंद्र अस्तित्वात आले. मात्र आता पाणबुड्यांच्या जगतात झालेले तंत्रबदल व हिंदी महासागरातील आव्हानांमुळे भारताच्या टेहळणीच्या कक्षा रुंदावल्या. त्यामुळे अधिक प्रगत केंद्राची आवश्यकता निर्माण झाली.

**पाणबुड्या संदेश कसा मिळवतील ?**

भारताकडे असलेल्या पारंपरिक डिझेल-इलेक्ट्रिक श्रेणीतील पाणबुड्यांना साधारण ४८ तासांनी तरी बॅटरी चार्ज करण्यासाठी समुद्रातून डोके वर काढावे लागते. मात्र आता नव्याने दाखल झालेल्या अणुभट्टीवर चालणाऱ्या पाणबुड्या महिनोन् महिने समुद्राखाली राहू शकतात. अशा पाणबुड्या संपर्कग्रहणासाठी त्यांचा एक अ‍ॅन्टेना त्यांच्या गरजेनुसार समुद्रपृष्ठावर काढतील आणि ज्यावेळी अ‍ॅन्टेना वर डोकावेल, तेव्हा त्यास व्हीएलएफ रेडिओलहरींचा संदेश ग्रहण करता येईल. हा सांकेतिक संदेश उलगडण्याचे (डिकोडिंगचे) काम तंत्रज्ञ करतील. त्यानुसार पाणबुडीचा कप्तान पुढील मार्गक्रमणा किंवा एखादी कृती ठरवू शकेल. यात पाणबुडी मात्र शक्यतोवर इतरांशी बोलणार नाही. कारण तसे झाल्यास तिचा ठावठिकाणा समजून येईल.

**अणुपाणबुड्या व संदेशवहन**

भारतीय नौदलाच्या ताफ्यात आयएनएस अरिहंत ही सुमारे साडेसातशे किलोमीटर पल्ल्यापर्यंतचा लक्ष्यवेध घेऊ शकणारी पहिली पाणबुडी प्रथम दाखल झाली. आता ‘आयएनएस अरिघात’वरील के ४ या क्षेपणास्त्राचा पल्ला साडेतीन हजार किलोमीटर इतका आहे. याच एसएसबीएन श्रेणीमध्ये ‘आयएनएस अरिधमन’ ही आणखी एक पाणबुडी दाखल करण्याचे प्रस्तावित आहे. तर एसएसएन म्हणजे केवळ अणुइंधनावर चालणाऱ्या (अण्वस्त्रधारी नव्हे) दोन पाणबुड्याही ताफ्यात घेण्याची भारताची योजना आहे. अण्वस्त्रांचा प्रथम वापर भारत करणार नाही, हे धोरण आहे. मात्र अन्य कोणत्या राष्ट्राने तो केलाच, तर आपल्या भूमीपासून दूरवरून प्रतिहल्ला करता यावा, हे या अण्वस्त्रधारी क्षमता असलेल्या पाणबुड्यांचे उद्दिष्ट आहे. अणुइंधनामुळे पाणबुडीची पाण्याखाली राहण्याची क्षमता कमालीची वाढते. मात्र इतका प्रदीर्घ काळ मूळ व्यूहरचनाकारांपासून विलग राहणेही परवडणारे नसते. त्यासाठीच हे संदेशवहन आवश्यक ठरते. बाकी पाणबुडीत एखादी दुर्घटना झाल्यास त्यातील नौसैनिकांना वाचविण्यासाठी पाण्याखालील बचावाचे एक वाहनही आता नौदलाने ताफ्यात सज्ज ठेवले आहे.

**समुद्राच्या पोटातील आव्हाने**

समुद्री क्षेत्रात प्रतिस्पर्ध्याला अचानक चकित करून गारद करण्यात किंवा विशिष्ट क्षेत्रात शिरकाव करण्यापासून रोखण्यात पाणबुडीचे स्थान आजवर अनन्यसाधारण राहिले आहे. हिंदी महासागराच्या विस्तीर्ण क्षेत्रात चीनने त्यांच्या पाणबुड्यांचा संचार वाढवला आहे. त्या अरबी समुद्रापर्यंत येऊ लागल्या आहेत. या संचाराला अटकाव करायचा, तर आपल्याला समुद्राच्या पृष्ठाखाली काय चालले आहे, त्याचे सातत्याने आकलन करून घ्यावे लागते. २६ नोव्हेंबर २००८च्या हल्ल्यानंतर समुद्री क्षेत्र आकलन (मॅरिटिम डोमेन अवेअरनेस) या विषयावर भारताने बरेच लक्ष केंद्रित केले. त्यादृष्टीने आवश्यक त्या सामग्रीची भर घातली. मात्र त्यापुढचे एक पाऊल म्हणजे समुद्राखालील क्षेत्राचे आकलन (अंडरवॉटर डोमेन अवेअरनेस). ही संज्ञा आता जोर धरू लागली असून खासकरून हिंदी महासागराच्या बाबतीत व हिंद-प्रशांत क्षेत्रातील आव्हानांच्या बाबतीत तिचा संदर्भ अधिक घेतला जातो.

**समुद्राखालील सेन्सर्सचे स्थान महत्त्वाचे**

समुद्री क्षेत्रात अनोळखी व संशयित जहाजांचा धोका वाढत असून तो केवळ समुद्रपृष्ठालगत मर्यादित राहिलेला नाही, तर समुद्रपृष्ठाखालीही अशा ‘ब्लॅक शिप्स’चा धोका आहे, त्यासाठीच समुद्राच्या पोटातील हालचाली टिपण्याच्या तंत्रात पारंगत होणे गरजेचे ठरते, असा मुद्दा संरक्षणतज्ज्ञ व भारताच्या अंटार्क्टिका मोहिमेत प्रतिनिधित्व केलेले नौदल अधिकारी निवृत्त कॅप्टन सरबजित परमार अधोरेखित करतात. ते म्हणतात, व्हीटीएमएससारख्या यंत्रणांद्वारे समुद्रात संचार करणाऱ्या जहाजांची ओळख पटविली जाते. जलवाहतुकीतील संशयास्पद संचारावर आपली पाळत असतेच. त्यासाठीच गुरगाव येथे हिंदी महासागरासाठीचे इन्फर्मेशन फ्युजन सेन्टर कार्यान्वित करण्यात आले आहे. या टेहळणीतही सर्वात छोट्या नौकांची ओळख पटविणे आव्हानच असते. मात्र त्याहीपेक्षा मोठे आव्हान म्हणजे समुद्रपृष्ठाखालील हालचालींचा वेध घेणे. त्यासाठीच समुद्राखाली हालचाली टिपणारे सेन्सर्स बसविणे आवश्यक ठरते. हे अत्यंत खर्चिक काम असते. समुद्रातील क्षारांचे प्रमाण व अन्य नैसर्गिक प्रतिकूलता यावरही या टेहळणीयंत्रांची परिणामकारकता ठरते. खोल समुद्र हा चहूबाजूंनी अफाट पसरलेला असतो. तिथे नेमके कुठे हे सेन्सर्स बसवायचे, हे अचूक ठरवावे लागते. जिथे शत्रूच्या पाणबुड्या किंवा संशयास्पद हालचालींची शक्यता अधिक आहे, जिथे आपल्या देशाच्या हिताला बाधा पोहोचू शकते, अशा नेमक्या ठिकाणी हे सेन्सर्स बसवावे लागतात. अर्थात केवळ सेन्सर्सवर आपली भिस्त ठेवून चालत नाही. त्यासाठीच परस्पर मित्रराष्ट्रांमधील गोपनीय माहितीचे आदानप्रदान यावर भर द्यावा लागतो. दोन राष्ट्रांमध्ये करारमदार झाल्याखेरीज इतर राष्ट्राच्या हद्दीत किंवा हितसंबंधी क्षेत्रात आपल्याला पाळत ठेवणेही शक्य नसते. या सर्वांचा समुद्राखालील क्षेत्राचे आकलन वाढविताना विचार करावा लागतो.

# बीड जिल्ह्याची बदनामी थांबवण्यासाठी वकील मंडळीने पुढाकार घ्यावा-न्यायमूर्ती चपळगावकर

## बीड जिल्हा वकील संघाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचा शानदार शुभारंभ

### आज शेलापागोटे आणि शॉर्ट फिल्म तर उद्या संगीत रजनीने होणार समारोप

यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात आज दिनांक २६ फेब्रुवारी रोजी ६:३० वाजता जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद यावलकर साहेब यांच्या शुभहस्ते कार्यक्रमाचा शुभारंभ होईल. यानंतर शेलापागोटे, नाटक, शॉर्ट फिल्म असे सांस्कृतिक कार्यक्रम होतील तर उद्या २७ फेब्रुवारी गुरुवार रोजी स्नेहसंमेलनाचा समारोप वकील संघाच्या गायक कलाकारांनी सादर केलेल्या बहारदार गीतांच्या संगीत रजनी कार्यक्रमातून सायंकाळी सात वाजता होईल. या कार्यक्रमाचा शुभारंभ सायंकाळी ६.३० वाजता प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश आनंद यावलकर साहेब आणि पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये होणार आहे. स्नेहभोजनाने कार्यक्रमाचा समारोप होणार आहे. वकील संघाच्या स्नेहसंमेलन निमित्त आयोजित सर्व कार्यक्रमांना उपस्थित राहून वकील बांधव भगिनी त्यांच्या कुटुंबीयांनी आणि पक्षकरांसह वकील प्रेमी नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन बीड जिल्हा वकील संघाच्या वतीने अध्यक्ष अँड रोहिदास येवले यांनी केले आहे.

### आमदार संदीप क्षीरसागर आणि आमदार विजयसिंह पंडित यांनी वकील संघाला दिले एक लक्ष रुपयाची पुस्तके

बीड विधानसभेचे आमदार संदीप क्षीरसागर यांनी ५० हजार रुपयांची विविध न्यायिक पुस्तके आणि गेवराई विधानसभेचे आमदार विजयसिंह पंडित यांनी देखील ५० हजार रुपयांची न्यायिक पुस्तके बीड जिल्हा वकील संघास भेट म्हणून दिली. आमदारांच्या वतीने अँड दीपक कुलकर्णी आणि अँड आनंद पाटील यांनी प्रतिनिधिक स्वरूपात ही पुस्तके न्यायमूर्तींच्या साक्षीने व्यासपीठावर बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष अँड रोहिदास येवले यांच्याकडे सुपूर्द केले.

### विजेत्या वकिलांचा न्यायमूर्तींच्या हस्ते सन्मान

स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने विविध प्रकारच्या क्रीडा स्पर्धा बीड जिल्हा वकील संघाच्या वतीने घेण्यात आल्या होत्या. या स्पर्धेमध्ये प्रथम,द्वितीय, तृतीय, उत्तेजनार्थ बक्षीसास पात्र ठरलेल्या वकील बांधव आणि भगिनी यांचे सन्मानपत्र सन्मानचिन्ह न्यायमूर्तींच्या शुभहस्ते देऊन सन्मानित करण्यात आले.

### बाहेरच्या मीडियाने बीड जिल्ह्याला जास्त बदनाम केले

त्या घटनेवरून बाहेरच्या मीडियाने बीड जिल्ह्याला सर्वाधिक बदनाम केले आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यातील पत्रकार बांधव आणि मीडियातील प्रतिनिधींनी बीड जिल्ह्याची किमान यापुढे तरी आता बदनामी होऊ नये यासाठी पुढे यावं आणि हे वातावरण बदलण्यासाठी सकारात्मक लेखणी उचलावी. हा विषय अजून जास्त संवेदनशील होऊ नये याची दक्षता मीडियाने घ्यावी असे खुले आवाहन मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती संतोषजी चपळगावकर यांनी केले.






**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्हा हा गुणवंतांचा जिल्हा आहे. या जिल्ह्याने कलाक्षेत्रात, शैक्षणिक क्षेत्रात, राजकीय क्षेत्रात, क्रीडा क्षेत्रात, सामाजिक क्षेत्रात, प्रशासकीय पातळीवर तसेच न्यायिक क्षेत्रामध्ये एवढेच नव्हे सर्वच क्षेत्रामध्ये यशस्वी गरुड झेप घेतलेली आहे. स्नेहभाव जपणारा जातीय सलोखा जोपासणाऱ्या या बीड जिल्ह्याला जर कोणी बदनाम करत असेल तर हे थांबवण्याची जबाबदारी प्रत्येक बीडच्या भूमिपुत्राची आहे. बिघडलेले हे वातावरण पुन्हा एकदा चांगले करण्यासाठी प्रामुख्याने आता वकील मंडळींनी पुढाकार घ्यावा असे भावनिक आवाहन बीड जिल्ह्याचे भूमिपुत्र मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती संतोषजी चपळगावकर यांनी बीड जिल्हा वकील संघाच्या वार्षिक स्नेहसंमेलन कार्यक्रमात केले. बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे बीड जिल्हा वकील संघाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उद्घाटन मंगळवार दिनांक २५ फेब्रुवारी रोजी सायंकाळी ७ वाजता मुंबई उच्च न्यायालय औरंगाबाद खंडपीठाचे न्यायमूर्ती संतोष चपळगावकर यांच्या शुभहस्ते दीप प्रज्वलाने झाले. यावेळी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री आनंद यावलकर साहेब तसेच प्रथम जिल्हा न्यायाधीश सुरेखा पाटील मॅडम यांच्यासह बीड जिल्हा वकील संघाचे अध्यक्ष अँड रोहिदास येवले, सचिव अँड सय्यद यासेर पटेल यांची प्रमुख उपस्थिती व्यासपीठावर होती. या कार्यक्रमासाठी सर्व न्यायिक न्यायमूर्ती, ज्येष्ठ विधीज्ञ, वकील बांधव, भगिनी त्याचबरोबर वकील संघाचे उपाध्यक्ष अँड अविनाश गडगे, अँड नितीन वाघमारे, सहसचिव अँड श्रीकांत जाधव, कोषाध्यक्ष अँड धनंजय गिराम, ग्रंथपाल सचिव अँड भीमा जगताप, महिला प्रतिनिधी अँड छाया वाघमारे यांच्यासह वकील संघाचे सर्व सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना न्यायमूर्ती संतोषजी चपळगावकर साहेब म्हणाले, मी बीड जिल्ह्याच्या भूमीमध्ये घडलो. बीड वकील संघाचा सदस्य ते बीड जिल्हा न्यायालयामध्ये मी काम केले याचा मला अभिमान आहे. बीड जिल्ह्याने सर्वाधिक न्यायमूर्ती दिले याचा मला सर्वाधिक स्वाभिमान आहे. बीड जिल्हा वकील संघाने मला आज या कार्यक्रमासाठी बोलावले उद्या महाशिवरात्र असली तरी हायकोर्ट सुरू आहे. तरी देखील मी या कार्यक्रमाला आवर्जून उपस्थित आहे. बीड जिल्ह्यातील कोणतेही न्यायिक प्रश्न असो जे माझ्या कक्षेत सोडवण्यासारखे असतील ते निश्चित सोडवण्याचा मी प्रयत्न करेल. आज न्यायालयाच्या क्षेत्राबाहेर स्वतंत्र नाट्यगृहात वकील संघाचा स्नेहसंमेलन सोहळा होत आहे हे वेगळेपण मला भावले. स्नेहसंमेलनाच्या निमित्ताने विविध स्पर्धा या ठिकाणी संपन्न झाल्या. न्यायिक कार्य करणाऱ्या वकील बांधव आणि भगिनी मध्ये असलेल्या सुप्त कलागुणांना वकील संघाने हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून दिले. त्याबद्दल मी त्यांचे अभिनंदन करतो. बीडचा बाणा हा क्रीडापटू असलेल्या वकील बांधवांनी मैदानावर गाजवावा आणि बीड जिल्ह्याचे नाव उज्वल करावे अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. पुढे बोलताना ते म्हणाले बीड जिल्ह्यातील माणसे प्रेमळ आहेत. सर्व जाती धर्मामध्ये स्नेहपूर्व भाव आहेत. मात्र काही स्वार्थापोटी राजकीय वातावरणामुळे बीड जिल्ह्याचे सामाजिक स्वास्थ्य आज बिघडले आहे. बीडला जर कोणत्या अधिकाऱ्याची बदली झाली तर ती बदली शिक्षा म्हणून पाहिली जात आहे. याचा मनाला खेद वाटतो. बिघडलेली ही परिस्थिती बदलण्यासाठी आता सर्वांनीच एकत्र येऊन या जिल्ह्यातील सामाजिक सलोखा जपण्याची जबाबदारी घेणे गरजेचे आहे. प्रामुख्याने मी वकील मंडळींना आवाहन करतो की बिघडलेली ही परिस्थिती बदलण्यासाठी आपण पुढाकार घ्यावा. न्यायदानाचे काम करणाऱ्या वकिलांनी पुढाकार घेतल्यास परिस्थिती लवकर पूर्ववत होईल असा मला विश्वास आहे. भ्रष्टाचारावर मात करणारे चांगले अधिकारी जर बीडला लाभले तर बीडकर त्यांना डोक्यावर घेतात हे जिल्हाधिकारी सुनील केंद्रेकर यांच्या बदलीनंतर सर्वांनी अनुभवले आहे. बीड जिल्हा वकील संघाने आज स्नेहसंमेलन सोहळा आयोजित केला आहे. यातून जातीय सलोखा निश्चित वाढेल असा मला विश्वास आहे.अशा सांस्कृतिक कार्यक्रमासोबतच वकील संघाने दरवर्षी वेगवेगळ्या विषयावर तज्ञ असणाऱ्या व्याख्यात्यांना देखील बोलवावे. याचा लाभ वकील बांधवांना भगिनींना होईल. चांगल्या लोकांचा संपर्क कसा वाढेल असा प्रयत्न देखील अशा कार्यक्रमातून करण्याचा प्रयत्न करावा, अशी महत्त्वपूर्ण सूचना त्यांनी आपल्या मनोगत आतून व्यक्त केली. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकामध्ये वकील संघाचे अध्यक्ष अँड रोहिदास येवले म्हणाले, मागील काही दिवसांपूर्वी आमचे तीन वकील बांधवांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. वकिलांना अभ्यासाचा, पक्षकारांच्या समस्यांचा त्यांना न्याय देण्यासाठी कराव्या लागणारा संघर्षाचा सर्वाधिक ताण तणाव असतो. त्यामुळेच या ताण तणावातून कुठेतरी विरंगुळा मेळावा. त्यांचे आयुष्य तणावमुक्त राहावे. यासाठीच आम्ही या वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन आणि त्या निमित्ताने विविध स्पर्धांचे आयोजन केलेले आहे. याला सर्व वकील बांधवांनी उस्फूर्त सहभाग घेऊन पाठबळ दिले याचा मला आनंद आहे.याप्रसंगी प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश श्री आनंद यावलकर साहेब म्हणाले, न्यायिक कार्य करणाऱ्या वकील बांधव आणि भगिनी मध्ये अनेक सुप्त कला गुण लपलेले आहेत. त्यांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देण्याचे महत्त्वपूर्ण कार्य बीड जिल्हा वकील संघाने केले त्याबद्दल मी त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन करतो. या कार्यक्रमाचे बहारदार सूत्रसंचालन अँड सुरेश वडमारे आणि अँड सारिका जोशी कुलकर्णी यांनी केले. वार्षिक स्नेहसंमेलनाच्या पहिल्याच शुभारंभ दिनी बीड जिल्हा वकील संघाचे सर्व सदस्य सहकुटुंब कार्यक्रमास उपस्थित राहून त्यांनी या कार्यक्रमाची शोभा खऱ्या अर्थाने वाढवली. वकील संघाच्या गायक कलाकारांनी सादर केलेल्या बहारदार गीतांच्या संगीत रजनी कार्यक्रमाने शानदार समारोप झाला.

# बीड जिल्हा पत्रकार संघाचे तालुकाध्यक्ष जाहीर

## वडवणी तालुकाध्यक्ष दत्ता कराड

**वडवणी । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या बीड जिल्हा शाखेने जिल्ह्यातील तालुका पत्रकार संघाच्या अध्यक्षांच्या नियुक्त्या जाहीर केल्या आहेत.तसेच आष्टी येथील ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे यांची प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती केली आहे.इलेक्ट्रॉनिक मीडियाच्या बीड जिल्हाध्यक्ष पदी दीपक जाधव यांची तर बीड शहर पत्रकार संघाच्या अध्यक्ष पदी प्रतिक कांबळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.सर्व नवनियुक्त तालुकाध्यक्ष यांनी तत्काळ नवीन सभासद नोंदणी करून तालुकास्तरीय उर्वरित कार्यकारिणी जाहीर करावी असेही कळवण्यात आले आहे.



महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे आणि राज्य समन्वयक संतोष मानूरकर यांच्या नेतृत्वाखाली कार्यरत असलेल्या पत्रकार संघाचे बीड जिल्हाध्यक्ष बालाजी तोंडे आणि जिल्हाध्यक्ष शेख रिझवान यांनी जिल्ह्यातील नवीन तालुकाध्यक्षांची नियुक्ती जाहीर केली आहे.या मध्ये बीड -धनंजय गुंदेकर ,परळी - बालासाहेब फड ,अंबाजोगाई - गोविंद महाराज केंद्रे ,केज - दुर्गादास लांब ,आष्टी - प्रविण पोकळे,धारूर -परमेश्वर राऊत ,,पाटोदा -महेश बेदरे ,शिरूर -शहेबाज पठाण ,माजलगाव -अंगद दराडे ,गेवराई- राहुल लोंढे ,वडवणी - दत्ता कराड यांचा समावेश आहे.तसेच बीड शहर अध्यक्ष पदी प्रतिक कांबळे यांची नियुक्ती करण्यात आली असून जिल्ह्यातील सर्व शहर अध्यक्षांची नियुक्ती करण्यासाठी त्यांना प्रभारी करण्यात आले आहे.त्याच प्रमाणे प्रदेश उपाध्यक्ष या रिक्त पदी आष्टी चे ज्येष्ठ पत्रकार प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे यांची राज्य कार्यकारी समितीच्या मान्यतेने नियुक्ती करण्यात आली आहे.

# साबला येथे महाशिवरात्री निमित्त स्वच्छता अभियान

**केज । प्रतिनिधी**

केज तालुक्यातील मौजे साबला येथे उत्तरेश्वर महाराज यांच जागृत देवस्थान असल्यामुळे येथील तरुण मित्रमंडळींनी स्वच्छता अभियान राबवलं . त्याची सुरुवात श्रीराम भक्त हनुमान महाराज मंदिर ते उत्तरेश्वर महाराज जागृत देवस्थान पर्यंत चा रस्ता व मंदिर परिसरातील पूर्ण स्वच्छता करण्याचं काम तरूणांनी पूर्ण केलं . तसेच गेल्या अनेक वर्षांपासून साबला येथील तरूण मित्रमंडळी साबला या गावात नेहमी कोणत्यानं कोणत्या कारणाने गावात स्वच्छता अभियान राबवत आहेत . गावातील तरुणाचं असं मत आहे माझा गाव , स्वच्छ गाव माझा गाव , सुंदर गाव या प्रमाणे गावातील तरुण मित्रमंडळी या अभियानात सहभागी होतात . आणि स्वच्छता अभियान राबवण्याचे काम करतात . या मध्ये आदर्श शिक्षक नरहरी काकडे , ग्रामपंचायत सदस्य ज्ञानेश्वर पांचाळ , पोपट काकडे , माजी उपसरपंच काशिनाथ नाईकनवरे , इंजिनियर महेशराव काकडे , राहुल मुळे , गणेश कटारे , लखन राऊत , राजेभाऊ



काकडे , वसंत नाईकनवरे , संदिपान काकडे , अनंत नाईकनवरे , अनिल भोसले , सदाशिव काकडे , जालींदर मुळे इत्यादी तरूण मित्रमंडळींनी या स्वच्छता अभियानात सहभाग नोंदवला आहे .

# छत्रपती संभाजीनगर विभागात एक दिवस गावकऱ्यांसोबत उपक्रम राबविणार-विभागीय आयुक्त दिलीप गावड

## प्रत्येक सप्ताहात दर बुधवारी तालुक्यातील एका गावात उपक्रमाचे आयोजन

**छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी**

केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजना, उपक्रम व सेवा ग्रामस्थांच्या दारी पोहचविण्यासाठी गाव पातळीवर काम करणाऱ्या सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांमार्फत विविध सेवा ठराविक कालावधीत पोहचविण्याच्या अनुषंगाने एक दिवस गावक-यांसोबत (ग्राम दरबार) हा नाविन्यापूर्ण उपक्रम छत्रपती संभाजीनगर विभागात राबविण्यात येणार आहे. विभागातील आठ जिल्ह्यातील ७६ तालुक्यातील प्रत्येकी एका गावात २८ फेब्रुवारीपासून उपक्रमाची सुरूवात होणार असल्याची माहिती विभागीय आयुक्त दिलीप गावडे यांनी दिली.

विभागीय आयुक्त कार्यालयात विभागीय आयुक्त श्री.गावडे यांनी आज एक दिवस गावकऱ्यांसोबत या उपक्रमासंदर्भात पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी उपायुक्त सुरेश बेदमुथा, सीमा जगताप, आदी उपस्थित होते.विभागीय आयुक्त श्री. गावडे म्हणाले, छत्रपती संभाजीनगर विभागातील प्रत्येक तालुक्यातील किमान एका गावात 'एक दिवस गावक-यांसोबत (ग्राम दरबार उपक्रम) या नाविन्यपूर्ण उपक्रमाचे आयोजन करण्यात येणार असून खासदार, आमदार, तसेच स्वातंत्र्यसैनिक व इतर प्रतिष्ठित नागरिक यांनाही आमंत्रित करण्यात येणार आहे. जिल्हा स्तरावरील विविध विभाग प्रमुखांना जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी तालुक्याचे वाटप करुन त्यांना रोटेशन पध्दतीने एका तालुक्याच्या एका गावामध्ये उपस्थित राहण्याबाबत निर्देशित करतील. जिल्हा स्तरीय अधिकारी यांच्या समवेत पचायत समितीच्या कार्यक्षेत्रात येणा-या एका गावास प्रत्येक आठवड्यातील दर बुधवारी पंचायत समितीचे विविध विभागाचे अधिकारी व ग्राम पातळीचे अधिकारी हे संयुक्तपणे गावात जाऊन ग्रामस्थासमवेत या उपक्रमाची अंमलबजावणी करणार आहेत.



# भारतीय संविधानाची प्रत भेट देत सामाजिक उपक्रमासह गवळी परिवार व प्रभाळे परिवाराचा विवाह सोहळा संपन्न

## प्रत्येक कुटुंबापर्यंत सरकारने संविधानाची प्रत द्यावी ही एक विनंती पर मागणी

**बीड । प्रतिनिधी**

दि.२३/२/२०२५ रविवार रोजी वडवणी तालुक्यातील आदर्शा कडे वाटचाल करणाऱ्या देवगाव नगरीमध्ये गवळी परिवार व प्रभाळे परिवार वधू चि. सौ.का. कोमल वर आनंत यांच्या विवाह सोहळ्या निमित्त देवगाव येथील रहिवासी गवळी परिवारातील कन्या कोमल हिच्या विवाह सोहळ्यानिमित्त मूळ पत्रिका धारक महिला भगिनींना भारतीय संविधानाची प्रत भेट म्हणून देत एक सामाजिक उपक्रमा सह हा विवाह सोहळा संपन्न करण्यात आला.भारतीय संविधानाची सन २०२४-२०२५ हे भारतीय संविधानास ७५ वर्ष पूर्ण झाल्याबद्दल सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणून देशभरात साजरे होत आहे, यामागील सरकारचा मुख्य हेतू हा आहे की भारतीय संविधान उद्देशिका मध्ये नमूद असल्याप्रमाणे भारतीय सार्वभौम समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा व त्यातील सर्व नागरिकास सामाजिक आर्थिक व राजनीतिक न्याय विचारा अभिव्यक्ती विश्वास श्रद्धा




व उपासना यांचे स्वातंत्र्य दर्जाची व संधीची समानता प्रत्येक नागरिकांमध्ये प्राप्त करून देण्याचा व त्यातील सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा तसेच राष्ट्राची एकता व एकात्मता यांचे आश्वासन पूर्तता करणारी बंधुता प्रवर्धित करण्याचा भारतीय संविधानाचा महत्त्वाचा उद्देश असल्याचे आपल्याला दिसून येते भारतीय राज्यघटनेबाबत जागरूकता व्हावी तसेच संविधानाची मूल्य भारतीय नागरिकापर्यंत पोहोचावी हा सरकारचा हेतू आहे ,चालू वर्षात सरकारकडून भारतीय संविधानाचा अमृत महोत्सवी वर्षा निमित्त वेगवेगळे उपक्रम चालू आहेत त्यातीलच एक भाग म्हणून भारतीय संविधान व त्यांची मूल्य प्रत्येक घराघरा पर्यंत जावीत तसेच प्रत्येक कुटुंबातील शालेय विद्यार्थी महाविद्यालय विद्यार्थी विद्यार्थिनी वंचित उपेक्षित समाजातील प्रत्येक घटकापर्यंत भारतीय संविधान पोहोचावे या माध्यमातून एक लहानसा प्रयत्न म्हणून लग्नामध्ये पारंपारिक साडी व इतर भेटवस्तू पाहुणे नातेवाईक मित्रपरिवार यांना आपण देत असतो ,यालाच पर्याय म्हणून लग्नामध्ये भारतीय संविधानाची २०० प्रत नातेवाईक मित्रपरिवार व महिला यांना देण्याचा या विवाह सोहळ्या मधून छोटासा प्रयत्न केलेल केलेला आहे, त्याचबरोबर महाराष्ट्र सरकारने महाराष्ट्रामध्ये लाडकी बहीण योजना तसेच आनंदाचा शिधा पत्रिका धारक बहिणींना साड्यांची भेट असे वेगवेगळे सामाजिक उपक्रम यशस्वीरित्या राबवलेले दिसतात,यामध्ये सरकारला एक छोटीशी विनंती म्हणून प्रत्येक कुटुंबापर्यंत भारतीय संविधानाची प्रत देण्याची विनंती पर मागणी करण्यात आली आहे. ही भारतीय संविधानाची प्रत शिधापत्रिकाधारक किंवा इतर घटकाच्या माध्यमातून सरकारने प्रत्येक कुटुंबापर्यंत पोहोचवावी अशी विनंती पर मागणी वधू चे चुलते ज्ञानेश्वर गवळी यांच्या कडून करण्यात आली. या कार्यक्रमात उपस्थित सर्व परिसरातील नातेवाईक मित्रपरिवार प्रभाळे , नेमाटे, मुळे, गिरगुने, सुरवसे परिवारांची मुलांची साथ लाभल्याने हा अनोखा विवाह सोहळा संपन्न करण्यात आला यासाठी सर्व सन्माननीय मित्रपरिवार नातेवाईक यांचे आभार देखील मानण्यात आले आहे.

## महिला आर्थिक विकास महामंडळच्या

# ५० व्या वर्धापन दिनी तेजस्विनी महिला व माविम मित्रांचा सन्मान

**बीड । प्रतिनिधी**

महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) चा सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिन महिला आर्थिक विकास महामंडळ जिल्हा कार्यालय बीड च्या वतीने हॉटेल विशाल फंक्शन हॉल, बीड येथे मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी नाबार्ड चे ऊऋच् मा. मार्कड सर, जिल्हा महिला बालविकास अधिकारी मा. फिरोज सर, उप मुख्य कार्यकारी अधिकारी (मबाक) मा.बडे सर, सहा.जिल्हा नियोजन अधिकारी मा. ईघारे सर, छणडच् चे जिल्हा समन्वयक मा. बडगुजर सर, सामाजिक कार्यकर्ते अशोकभाऊ तांगडे, बाल कल्याण समिती अध्यक्ष तत्वशिल कांबळे अध्यक्ष राजर्षी छत्रपती शाहू महाराज प्रतिष्ठान बीड ,उचठउ अध्यक्षा इत्यादी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. माविम चे जिल्हा समन्वय अधिकारी सुखदेव चिंचोलीकर यांनी आपल्या प्रास्ताविक मध्ये माविम ची ओळख सांगितली. दिनांक २४ फेब्रुवारी १९७५ रोजी आंतरराष्ट्रीय महिला वर्षा निमित्त महिला सक्षमीकरणा साठी महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम) ची स्थापना महाराष्ट्र शासनाच्या महिला बाल विकास विभागाने केली. या महामंडळा च्या संस्थापक अध्यक्ष तत्कालीन राष्ट्रपती प्रतिभाताई पाटील या होत्या. आज ३६



जिल्ह्यात या महामंडळाचे कार्यालय आहेत. त्यानुसार आपल्या बीड जिल्हा कार्यालय मार्फत ८ तालुक्यात २४९ गावातून २५६८ महिला बचतगट व्दारे २९५१६ महिलांचे संघटन केले आहे. ६ तालुका स्तरावर व ८ शहरात २५० ते ३०० बचतगटासाठी एक लोक संचलित साधन केंद्र नावाचे महिला सक्षमीकरणासाठी कार्यालय सुरू झाले आहेत. या केंद्रामार्फत माविम च्या सहकार्याने महिला बचतगटांना आज अखेर २४८ कोटीचे सवलतीच्या दराने विविध बँकेचे बँक कर्ज वितरीत केले आहे. परतफेडीच्या दृष्टीने दरमहा १००% परतफेड करणारा आपला बीड जिल्हा महाराष्ट्रात ७ व्यां क्रमांकावर आहे. या बँक कर्जातून जवळपास ७०% महिलांचे शेती व बिगर शेतीवर आधारित व्यवसाय चालू आहेत. त्यामुळे त्यांचे दरडोई उत्पन्नात वाढ झाली आहे. महिलांच्या आर्थिक विकासा बरोबर सामाजिक विकास सुद्धा माविमने केला आहे. बचतगटाच्या माध्यमातून अनेक महिलां उत्कृष्ट उद्योजक, आदर्श माता व सरपंच म्हणून आपली कर्तबगारी दाखवित आहेत. गावात व कुटुंबात स्त्री पुरुष समानता आणणे, स्त्री भ्रूणहत्या रोखणे, मुलीचा जन्मदर वाढविणे, कुपोषण निर्मूलन, सकस आहार, परसबाग, वृक्षारोपण, बालविवाह रोखणे, जातीभेद बंद करणे, मुलींचे शिक्षण, दारूबंदी इत्यादी विषयावर माविम च्या माध्यमातून महिला बचतगटांनी काम केले आहेत. त्यामुळे आज राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर माविम ची ओळख निर्माण झाली आहे. या सुवर्ण महोत्सवी वर्धापन दिनानिमित्त कर्तुत्ववान तेजस्विनी महिला, उत्कृष्ट उद्योजक महिला, आदर्श माता व तेजस्विनी कन्या, माविम मित्र यांच्या सन्मान माविम बीड कार्यालयाच्या वतीने मान्यवरांच्या शुभ हस्ते करण्यात आला.तसेच कार्यक्षेत्रात स्वयंसहाय्य महीला बचतगट चे संगोपन संवर्धन करणाऱ्या सर्व उचठउ स्टाफ चा सन्मान मान्यवरांच्या हस्ते करण्यात आला. उपस्थित मान्यवरांनी आपल्या मनोगत मध्ये माविम च्या प्रगती ची प्रशंसा करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा कार्यालयाचे लेखाधिकारी गजानन ढोणे, जिल्हा प्रकल्प सल्लागार सागर इंदूरकर, एम आय एस सल्लागर नरेश कुरापती व तालुका सीएमआरसी मॅनेजर ,लेखापाल व सहयोगीनी यांनी विशेष प्रयत्न केले.

## निमशासकीय संस्थेवरील ट्रेनी शिक्षकांनी

# मा.जिल्हाधिकारी व शिक्षणाधिकारी साहेबांना निवेदनाद्वारे दिला उपोषणाचा इशारा



**बीड । प्रतिनिधी**

कौशल्य रोजगार उद्योजकता व नाविन्यता विभागाचा शासन निर्णय क्र. सकीर्ण २०२४/प्र.क्र.९०/व्याशी ३ दि.०९ जुलै २०२४ नुसार शिक्षक प्रशिक्षणार्थी ट्रेनी शिक्षक मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण योजना अंतर्गत शिकाऊ प्रशिक्षणार्थी म्हणून दिनांक २६/०८/२०२४ ते दि.२५/०२/२०२५ या कालावधीसाठी ट्रेन शिक्षकांचा सर्व शाळेवर गटशिक्षण कार्यालय यांच्यामार्फत मुख्यध्यापकांनी शैक्षणिक पात्रतेनुसार रुजू आदेश देऊन सर्व ट्रेनिंग शिक्षकांची निवड करण्यात आली परंतु जिल्हा परिषद शाळेबरोबर निमशासकीय शालेय संस्थेवरील ट्रेनिंग शिक्षकांची ऑनलाईन माहिती अपलोड केली नाही. गेले सहा महिने झाले आम्ही शाळेत नेहमीप्रमाणे जात आहोत. आम्हाला फक्त रुजू करून घेण्यात आले त्यानंतर संबंधित गटशिक्षणाधिकारी कार्यालयांने संस्थेतील शाळांना कुठल्याही प्रकारची माहिती दिली नसल्याने हा गोंधळ उडाला आहे. गेल्या अनेक दिवसांपासून हे ट्रेनी शिक्षक वारंवार संबंधित गटशिक्षणाधिकारी कार्यालयाशी भेट दिली असता आमच्याकडे अशी कुठलीही माहिती नसल्याचे ते सांगत आहे. जर माहिती दिली नाही तर आम्हाला रुजू करून घेण्याचे आदेश दिले कोणी असा प्रश्न उपस्थित होत आहे.आम्ही लोक आधीच बेरोजगार तरुण होतोत आता सरकारने आम्हाला परत बेरोजगार केले व त्यांची फसवणूक केली. त्यामुळे दिनांक १०/०२/२०२५ रोजी केज तहसीलदार साहेब, गटशिक्षणाधिकारी केज, गट विकास अधिकारी यांना निवेदनाद्वारे विनंती केली असता आत्तापर्यंत कुठल्याही प्रकारची आम्हाला माहिती मिळाली नसल्याकारणाने दिनांक २५/०२/२०२५ रोजी शिक्षणाधिकारी कार्यालय बीड याठिकाणी निवेदन देऊन उपोषणाचा इशारा देखील देण्यात आला आहे

## ज्ञानबोधिनी विद्यालयाच्या स्नेहसंमेलनात रंगला भव्य दिंडी सोहळा

# ज्ञानबोधिनी प्रा.विद्यालयाचे न भूतो न भविष्यती असे वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

## गोरगरीब,कष्टकरी तसेच सर्व स्तरातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण देणारी संस्था म्हणजे ज्ञानबोधिनी विद्यालय-डॉ.संतोष मुंडे

**परळी । प्रतिनिधी**

ज्ञानबोधिनी प्रा.विद्यालय ही केवळ पुस्तकी ज्ञान देणारी संस्था नाही तर ती ज्ञानाबरोबरच गोरगरीब कष्टकरी तसेच सर्व स्तरातील विद्यार्थ्यांना ज्ञानाबरोबरच उच्च दर्जाचे गुणवत्ता पूर्ण व सर्वगुणसंपन्न विद्यार्थी घडविणारी परळी शहरातील एक अग्रगण्य शाळा आहे असे गौरवोद्गार आपल्या उद्घाटन प्रसंगी भाषणातून बोलताना डॉ. संतोष मुंडे साहेब (उपाध्यक्ष :दिव्यांग कल्याण मंत्रालय मुंबई )यांनी काढले.कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन तसेच सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री पी. एस. घाडगे सर (माजी अध्यक्ष मराठवाडा शिक्षक संघ) हे होते तर प्रमुख पाहुणे म्हणून श्री .अमोल शिंगणे साहेब (पी.एस.आय. परळी शहर पोलिस स्टेशन) यांच्यासह डॉ. अशोक मगर साहेब (श्रीराम हॉस्पिटल )श्री. प्रदीप मुंडे (युवा सरपंच तळेगाव )श्रीमती प्रेमीला ताई तांदळे मॅडम (माजी मुख्याध्यापक संस्कार शाळा )डॉ. सौ सुवर्णा टिंबे मॅडम (सिद्धिविनायक हॉस्पिटल) श्री. बालासाहेब फड (अध्यक्ष परळी तालुका पत्रकार संघ ), गोविंद महाराज केंद्रे तालुका अध्यक्ष अंबाजोगाई इंजि. मुकुंद शेप डॉ.श्वेता मुकुंद शेप सौ.वर्षाताई मुंडे (अध्यक्षा ज्ञानबोधिनी विद्यालय) श्री. प्रशांत मुंडे (उपाध्यक्ष ज्ञानबोधिनी विद्यालय) डॉ. श्रीनिवास मुंडे ,श्री .लक्ष्मण मुंडे सर (सचिव तथा मुख्याध्यापक ज्ञानवर्धिनी विद्यालय )आदींची उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री.पी. एस. घाडगे सर यांनी मार्गदर्शनपर भाषणात सांगितले की ज्ञानबोधिनी विद्यालय ही ज्ञानदानाबरोबरच आदर्श,शिस्त लावणारी आणि उच्च शिक्षण देणारी शाळा आहे. या शाळेची वाटचाल अगदी योग्य दिशेने व या शाळेत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांचे भविष्य उज्वल असल्याचे त्यांनी सांगितले तसेच शाळेचे मुख्याध्यापक



तथा संस्थेचे सचिव श्री. लक्ष्मण मुंडे सर यांनी आपल्या प्रास्ताविक पर भाषणात ज्ञानबोधिनी विद्यालयात राबविले जाणारे उपक्रम,पालक मेळावे,वर्गनिहाय विविध उपक्रम विद्यार्थ्यांच्या गुणवत्ता वाढीसाठी करण्यात येणारे प्रयन्त ,आगामी काळात राबविले जाणारे उपक्रम याविषयी माहिती सांगितली. ज्ञानबोधनी विद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन मोठ्या उत्साहात व जल्लोषपूर्ण वातावरणात संपन्न झाले .या सोहळ्यासाठी शहरातील पंचवटी नगर मधील श्रद्धा मंगल कार्यालय या ठिकाणी वार्षिक स्नेहसंमेलनाचे आयोजन करण्यात आले होते .स्नेहसंमेलनात विद्यार्थ्यांनी आपल्या अविस्मरणीय सादरीकरणाने उपस्थित प्रेक्षकांची मने जिंकली.विविध सांस्कृतिक कार्यक्रम सादर करून आपल्या कलागुण दाखवले. विद्यार्थ्यांची प्रत्येक कला ही सगळ्यांना मंत्रमुग्ध करणारी होती. रंगमंचावर विद्यार्थ्यांनी बहारदार नृत्य ज्यात गणेश वंदना, हुंडवणूक हुंडा नको मामा फक्त पोरगी द्या मला, पोवाडा, महिला सुरक्षा, मोबाईल बुरी बला यासारखे समाज प्रबोधनपर नाटके व गीते तसेच शेतकरी गीत, कोळीगीत, देशभक्तीपर गीते सादर केली, या स्नेहसंमेलनाचे उत्कृष्ट सादरीकरण ,वेळेचे नियोजन योग्य पद्धतीने केले होते. या स्नेहसंमेलनाचे सूत्रसंचालन श्री. जाधव सर श्री. गोपनपाळे सर श्री. केंद्रे सर तसेच श्री.गवंडगावे सर, सौ. कांबळे मॅडम यांनी केले. तर आभार प्रदर्शन श्री.हैदराबादे सर यांनी मानले. हे स्नेहसंमेलन शिस्तबद्ध ,नियोजनबद्ध व यशस्वी होण्यासाठी शाळेतील सर्व शिक्षक शिक्षिका व शिक्षकेतर कर्मचारी यांनी प्रयत्न केले.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक अजय महादेव भांगे यांनी निर्मिती प्रिंटिंग प्रेस, टाकळी रोड , धोंडीपुरा , जोशी नर्सिंग होमच्या समोर बीड ता.जि. बीड ४३११२२ येथे छापून दैनिक वादळवार्ता कार्यालय, महात्मा फुले नगर केज, पाण्याच्या टाकीजवळ केज ता. केज जि. बीड ४३११२३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.मो.न.९४२२६६००७७

This newspaper is printed by owner, printer,publisher,editor Ajay Mahadev Bhange at nirmiti printing press, takli road, dhondipura in front Joshi nursing Home,Beed,tq.Beed,Dist.Beed 431122, Maharashtra and published at Dainik Vadalvarta office Mahatma Phule Nagar, near water tank kaij tq.kaij dist.Beed 431123(Maharashtra) mo.no.9422660077